# मेट्रो होतेय सज्ज

## आरे ते बीकेसी टप्पा आठ गाड्या ८५ किमी वेगाने कापणार

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** आरे ते कफ परेड या मेट्रो ३ या भूमिगत मार्गिकेसाठी आठ गाड्या आरे येथील कारशेडमध्ये दाखल झाल्या आहेत. ताशी ८५ किमी वेगाने १६ किमी अंतर कापण्यासाठी या मेट्रो गाड्या सज्ज आहेत. डिसेंबरपर्यंत या मार्गिकेचा पहिला टप्पा सुरू करायचा असून आणखी एका गाडीची त्यासाठी प्रतीक्षा आहे.

आरे ते कफ परेड ही मेट्रोची मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी मार्गिका आहे. एकूण ३३ किमी लांबीची ही मार्गिका आहे. या मार्गिकेवर २६ स्थानके भूमिगत व एक स्थानक जमिनीवर आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा जवळपास १६ किलोमीटर लांबीचा असेल. पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याआधीच केली आहे. त्यादृष्टीने ही मार्गिका उभी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) जोमाने तयारी सुरू केली आहे. एकीकडे 'एमएमआरसी'च्या उच्चाधिकाऱ्यांनी तातडीने प्रकल्पाचा पाहणी दौरा सुरू केला असताना आता दुसरीकडे आरे येथील कारशेडमध्ये मेट्रोसाठीचे डब्बे व गाड्या उभ्या करण्यास सुरुवात झाली आहे.



### डिसेंबरपर्यंत मार्गिका सुरू करण्याची तयारी

'एमएमआरसी'ने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्यातील आरे ते बीकेसी ही सेवा सुरू करण्यासाठी प्रत्येकी आठ डब्यांच्या एकूण नऊ गाड्यांची गरज असेल. त्यापैकी आठ गाड्या आरे येथे सज्ज आहेत. या गाड्यांची कमाल वेग क्षमता ताशी ९५ किमी असून त्या वेगाने याआधीच चाचणी पूर्ण झाली आहे; मात्र प्रत्यक्ष सेवा सुरू झाल्यानंतर ताशी ८५ किमी वेगाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अत्याधुनिक प्रणालीने सज्ज असलेले हे डबे कमीत कमी विजेवर अधिकाधिक क्षमतेने धावणारे आहेत. चाचणीसह हे डब्बे व गाड्या आता सज्ज झाल्या आहेत. डिसेंबरपर्यंत आरे-बीकेसी मार्गिका सुरू करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

### मेट्रो ३ मार्गिकेची वैशिष्ट्ये

- राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो
- **एकूण खर्च :** ३३ हजार कोटी रू.
- एकूण स्थानके : २७
- **पहिल्या टप्प्यातील स्थानके :** १०
- **पहिल्या टप्प्याची स्थिती :** ९५ टक्के पूर्ण, प्रणालीची कामे ७० टक्के पूर्ण
- संपूर्ण मार्गिकेचे भुयारीकरण : १०० टक्के पूर्ण
- **डब्यांचे उत्पादक :** अलस्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड
- **एकूण डबे :** २४८
- **एकूण गाड्या :** ३१